# सुधारित जाहिरात

## जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर
## वॉक इन इंटरव्ह्यूद्वारे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची पदे भरण्याकरीता मुलाखत

मा.जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या निवड समितीद्वारे आरोग्य सेवा, नागपूर मंडळअंतर्गत असलेल्या चंद्रपूर जिल्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण/उपजिल्हा रुग्णालय येथील महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा (गट-अ) संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (गट-अ) ची रिक्त पदे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीने फक्त ११ महिन्याचे कालावधीसाठी तात्पूरत्या स्वरुपात खालीलप्रमाणे विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहुन भरावयाची आहेत.

१)सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यासाठी किंवा सदर पदावर एम.बी.बी.एस. अर्हता धारक नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच राहील.

२) सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यासारखे म.ना.से.निवृत्तीवेतन ,म.ना.से.(रजा),नियम लागू राहणार नाहीत तसेच ते विमा योजना ,भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत. त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाहीत.

३)सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांचा धारणाधिकार असणार नाही.

४)कंत्राटी स्वरुपात तात्पूरती नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची भविष्यात विहीत मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पूरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडून दिली जाणार नाही.

५)केवळ तात्पूरती कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही किंवा सेवा जेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

६)सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.

७)सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना सेवाकाळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक माहिण्याचे मानधन भरुन कार्यमुक्त होता येईल.
८)निवड झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक असेल.तसेच बायोमेट्रीक हजेरीप्रमणालीवर हजेरी लावणे अनिवार्य राहील.

९.)वरिल सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.१००/- चे स्टॅम्पपेपर करारनामा करण्यात येईल.
सदरहू **तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी पदे भरण्यासाठी दर सोमवारी वॉक-इन-इंटरव्ह्यू सकाळी ११.०० ते दु.२.०० या वेळेत (या दिवशी शासकीय सुट्टी असल्यास दुसऱ्या दिवशी भरती प्रक्रिया राबविण्यात येईल) जिल्हा शल्य चिकित्सक,चंद्रपूर कार्यालयात आयोजित करण्यात येत आहे**.तरी इच्छूक एमबीबीएस/विशेषज्ञ/बी.ए.एम.एस अर्हताधारक उमेदवारांनी थेट मुलाखतकरीता विहीत दिवशी व वेळेत उपस्थित रहावे. तसेच नियुक्ती करीता एमबीबीएस/विशेषज्ञ अर्हताधारक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

उमेदवारांनी येतांना सोबत शैक्षणिक अर्हतेचे सर्व दस्तऐवज, वैद्यकीय परिषदेचे नोंदणी. प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकीत प्रतीचा एक संच, फोटो असलेले ओळखपत्र इत्यादी सोबत घेवून येणे आवश्यक आहे.

उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच अनधिकृत गैरहजर असलेल्या/संपामध्ये सहभागी असलेले/शासन सेवेत शिस्तभंग कार्यवाहीकरीता काढून टाकलेले वैद्यकीय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही. खालील रिक्त पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

अ) एमबीबीएस पदाकरीता आदिवासी दूर्गम भागात ६०,०००/- व इतर भागात रु.५५,०००/- एवढे मानधन राहील. **(एकुण रिक्त पदे -१०)**
ब) विशेषज्ञ पदाकरीता आदिवासी दूर्गम भागात ७०,०००/- व इतर भागात रु. ६५,०००/- एवढे मानधन राहील. **(एकुण रिक्त पदे -३०)**
क) बीएएमएस पदाकरीता आदिवासी दूर्गम भागात ४५,०००/- व इतर भागात रु.४०,०००/- एवढे मानधन राहील.**(एकूण रिक्त पदे - ४ )**

सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती
तथा जिल्हा शल्यचिकित्सक,चंद्रपूर